# मित्रता गुणांशी सद्गुण तुमचे मित्र

आज प्रत्येकास मित्रासमान व्यक्तीची नितांत आवश्यकता भासते. मित्र नकोसा वाटणारे फार क्वचितच असतील. कारण जीवनात सुख-दुखाना वाटून घेणारा, संकटकाळी मदतीस धाव घेणारा तो मित्रच! परंतु या कलियुगात जेथे मनुष्य स्वतः शी ईमानदारी राखत नाही. तेथे इतरांशी प्रामाणिक कसा असेल बरे? मित्रापेक्षा खरे प्रामाणिक मित्र शोधावे लागतात. प्रत्येकाशी सावधानतेने वागावे लागते. कुठे भेटतील बरे असे खरे प्रामाणिक, परीक्षेच्या वेळेस साथ देणारे मित्र?

तर चला तुम्ही तुमची तुमच्या प्रामाणीक मित्राशी भेट करवून देतो, ते ''आत्म्याचे'' म्हणजे तुमचे सतगुण! काय तुम्हालाही असं जाणवतं की, तुमच्या मधील एखादया गुणामुळे तुमची वारंवार रक्षा होते? तर चला परिचयच करुन देतोय. आपला सर्वात पहिला मित्र आहे आनंद जर हा आपल्या संगतीला असल्यास औदास्या, कमतरता आपणा जवळही फिरकू शकत नाही. हा आनंद आपल्या तनामनाचे आरोग्य राखतो. दुसरी मैत्रिण आहे शांतता, ही अशी सखी आहे जी अंतर्मुख होऊन शांत चुप बसण्यास प्रेरित करते. हिचे कार्य म्हणजे सर्वाप्रती शुभ भावना ठेवीत सर्वाना स्वतः सारखं शांत बनविणं.

तिसरा मित्र आहे गांभिर्य मित्राच्या टोळीमधील हा सर्वात वरीष्ठ मित्र, बाह्यमुखता, चेष्टा, मस्करी, थट्टा, टेहाळणी व्यर्थ-चिंतन याला कदापी पसंद नाही. समजुतदारपणाचा सल्ला हा आत्म्यास देत राहतो.

आपला चौथा मित्र आहे माधुर्य हा एक असा मित्र आहे जो सर्वाना आपलेसं करवितो. पारस्पारीक सदभाव वाढवितो. चुकांची दुरुस्ती करकतो, या मित्रास सदैव बरोबर ठेवावे, तर बिघडलेले कामही बनेलच. अन्य एक मित्र आहे ज्यास आपण आपला अंगरक्षकही मानु- संबोधू शकतो. तो निर्भिडपणा होय. हा सोबतीला असताना कुण्या मायावीची विकारांची आपल्या जवळ येण्याची काय मजल? पण हा जर सोडून गेला तर लहान सहान विघ्न परिस्थितीही आपणास भिती घालतात. याच्या बरोबरच याची लहानभगिनी सत्यताही येते, जी खोट्या व्यवहारापासून आपणास परावृत्त करते.

नम्रता ही आपली अजून एक सखी हिस बघुन अनेक दुसरे गुणही आपल्याबरोबर गट्टी करतात. माहित आहे. सर्वच मित्रांना हिचा सहवास आवडतो. ही ज्याची मैत्रिण बनते त्याचं पात्र सर्वाच्या आर्शिवादांनी भरपूर होते. धीर/धैर्य असा मित्र आहे. जो संकटकाळी फार चांगल्याप्रकारे आपली

सोबत करतो. काही मनाविरुध्द घडल तरी पाठ थोपटून हाच सांगतो, घाबरु नकोस. पुढे खुपकाही बर होणार आहे. ज्यामुळे आपण स्थिर होतो.

आता सर्वात सुंदर अशी सर्व गुणांची महाराणी येते, भेटायला ती आहे पवित्रता हिच आपला देवदुताप्रमाणे श्रृंगार करीत जाते, आपल्या मन, वचन, कर्म, दृष्टीकोन, विचार, शक्ती, व कृतीचाही श्रृंगार करते. अवगुण या मैत्रिणीस आपणापासून हिरावून पाहत असते. परंतु जोपर्यत आपल्या हातात पवित्रतेचा हाथ ठाम आहे. तोपर्यंत आपल काहीही वाईट होऊ शकत नाही.

अन् या सर्व गुणांशी आपली मैत्री जुळवून देणारा सर्वात परममित्र आहे प्रिय 'खुदादोस्त प्राणसखा' परमात्मा शिवबाबा शिवसंस्था आहे, या विकारी जगात अवगुणांची वाईट संगत आपणास न जडावी म्हणून आपल्यास हे सर्व अष्टमित्र परमात्म्याने दिले आहेत. जर यासोबत आपण खेळलो बागडलो तर एकाकीपणा कधीही जागवणार नाही.

तर मग काय विचार करता? उशीर कसला आहे? हे सुंदर मित्र मित्रतेस तयार उभे टाकलेत उशीर तो फक्त तुमच्याा मित्रतेचा हात पुढे सारसावण्याचा तार करणाऱ्यांना मैत्री सतगुणांशी?

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com